MahaSarav.com • अधिकृत अभ्यास साहित्य

मराठी वाक्यप्रचार व त्याचे अर्थ

५५०+ वाक्यप्रचार, अर्थ व वाक्यात उपयोग (सविस्तर संकलन)

MPSC राज्यसेवा / गट ब व क | इयत्ता १० वी (SSC Board) | पोलीस भरती 2026 | तलाठी भरती | जिल्हा परिषद व सर्व सरळसेवा

 MahaSarav Mobile App वर मोफत सराव चाचणी सोडवा

दररोज नवीन टेस्ट सिरीज, चालू घडामोडी, मागील प्रश्नपत्रिका व ऑल महाराष्ट्र रँकिंग

 ॲप डाउनलोड करा (Android & iOS)

Scan to Install

भाग १: परीक्षेत वारंवार विचारले जाणारे Top 40 वाक्प्रचार (अर्थ व वाक्यात उपयोग)

(विशेषतः इयत्ता १० वी SSC बोर्ड परीक्षा व MPSC लेखी/MCQ परीक्षेसाठी अत्यंत उपयुक्त)

वाक्यप्रचार	अचूक अर्थ	वाक्यात उपयोग
अंग चोरणे	फार थोडे काम करणे / आळस करणे	रोहन घरच्या कामात नेहमी अंग चोरतो.
अंगाची लाही लाही होणे	अतिशय संताप येणे / खूप राग येणे	स्वतःची चूक नसतानाही अपमान झाल्यावर शामच्या अंगाची लाही लाही झाली.
अंगात वीज संचारणे	अचानक खूप बळ किंवा उत्साह निर्माण होणे	शिवरायांचे नाव ऐकताच मावळ्यांच्या अंगात वीज संचारली.
अंगवळणी पडणे	एखाद्या गोष्टीची सवय होणे	सकाळी लवकर उठून अभ्यास करणे समीरच्या अंगवळणी पडले आहे.
अकलेचा कांदा	अतिशय मूर्ख मनुष्य	त्या अकलेच्या कांद्याला कितीही समजावून सांगितले तरी तो ऐकत नाही.
आकाश फाटणे	चारही बाजूंनी एकाच वेळी मोठी संकटे येणे	दुष्काळात शेतकऱ्याच्या घरावर आभाळ कोसळले, जणू आकाशच फाटले होते.
आकाशपाताळ एक करणे	शक्य तितके पराकोटीचे प्रयत्न करणे	हरवलेला मुलगा शोधण्यासाठी आई-वडिलांनी आकाशपाताळ एक केले.
आढेवेढे घेणे	टाळाटाळ करणे / नाही-नाही म्हणणे	मदत मागायला गेल्यावर तो मदत करण्यास आढेवेढे घेऊ लागला.
उंटावरून शेळ्या हाकणे	कामात स्वतः भाग न घेता दुरून सूचना देणे	स्वतः काही न करता उंटावरून शेळ्या हाकणे बंद करा.
उखळ पांढरे होणे	भरपूर संपत्ती मिळणे / खूप नफा होणे	नवीन व्यापारात यंदा सावकाराचे उखळ पांढरे झाले.
उंबराचे फूल	क्वचितच भेटणारी व्यक्ती / दुर्मिळ वस्तू	नोकरीनिमित्त परगावी गेलेला आनंद गावी आल्यावर उंबराचे फूल झाला आहे.
उर भरून येणे	गदगदून येणे / अतिव आनंद किंवा दुःख होणे	मुलाला सैन्यात अधिकारी झालेला पाहून वडिलांचा उर भरून आला.

वाक्यप्रचार	अचूक अर्थ	वाक्यात उपयोग
कंठस्नान घालणे	ठार मारणे / संपवून टाकणे	भारतीय जवानांनी देशाच्या सीमेवर घुसखोरांना कंठस्नान घातले.
कंबर कसणे	निश्चयाने व जिद्दीने कामासाठी तयार होणे	दहावीच्या बोर्ड परीक्षेत प्रथम येण्यासाठी स्नेहाने अभ्यासाला कंबर कसली.
कपाळाला हात लावणे	निराश होणे / हताश होणे	पिकांचे अतोनात नुकसान झालेले पाहून शेतकऱ्याने कपाळाला हात लावला.
कान टोचणे	चूक लक्षात आणून देऊन समज देणे	मुलाच्या चुकीच्या वागणुकीबद्दल वडिलांनी त्याचे चांगलेच कान टोचले.
कानउघाडणी करणे	कडक शब्दांत समज देणे	गृहपाठ न केल्यामुळे वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांची कानउघाडणी केली.
काढता पाय घेणे	संकटाची चाहूल लागताच तिथून निघून जाणे	पोलिसांची गाडी येताच चोराने तेथून काढता पाय घेतला.
केसाने गळा कापणे	विश्वासात घेऊन फसवणूक करणे / घात करणे	भागीदारानेच पैशांची अफरातफर करून मित्राचा केसाने गळा कापला.
गाशा गुंडाळणे	मुक्काम हलवणे / पोबारा करणे	काम पूर्ण झाल्यावर मजुरांनी आपला गाशा गुंडाळला.
घोडे पेंड खाणे	काम अडकून पडणे	इतकी तयारी करूनही फाइल मंजुरीसाठी नेमके कुठे घोडे पेंड खाते हे समजेना.
चूक पदरात घेणे	केलेली चूक मोठ्या मनाने मान्य करणे	स्वतःची चूक कळताच त्याने ती पदरात घेतली व दिलगिरी व्यक्त केली.
डोळ्यात धूळ फेकणे	फसवणूक करून निसटणे	चोराने सुरक्षारक्षकांच्या डोळ्यात धूळ फेकून दागिने पळवले.
दगा देणे	ऐनवेळी विश्वासघात करणे	खऱ्या मित्राने संकटाच्या वेळी कधीही दगा देऊ नये.
दाद न देणे	प्रोत्साहन न देणे / प्रतिसाद न देणे	विरोधी पक्षाच्या आक्रमक भाषणाला सभागृहाने अजिबात दाद दिली नाही.
धूम ठोकणे	वेगाने पळून जाणे	कुत्रा भुंकताच खोडकर मुलांनी तिथून धूम ठोकली.
नांगी टाकणे	हार पत्करणे / माघार घेणे	पोलिसांचा ससेमिरा वाढताच गुंडाने लगेच नांगी टाकली.
नाक कापणे	अपमान करणे / अब्रू घालवणे	गैरकृत्य करून मुलाने घराण्याचे नाक कापले.
पाणी पाजणे	पराभूत करणे / मात करणे	कुस्तीच्या फडात पैलवानाने प्रतिस्पर्ध्याला चांगलेच पाणी पाजले.
पायमल्ली करणे	अपमान करणे / पायदळी तुडवणे	कोणत्याही नागरिकाने कायद्याची पायमल्ली करू नये.
पाठ चोरणे	कामात टाळाटाळ करणे	अडचणीच्या प्रसंगी विश्वासू माणसाने पाठ चोरू नये.
पोटात कावळे ओरडणे	प्रचंड भूक लागणे	दिवसभर काम केल्यामुळे संध्याकाळी त्याच्या पोटात कावळे ओरडू लागले.
फितूर होणे	शत्रूला सामील होणे	स्वार्थासाठी फितूर होणाऱ्या व्यक्तीला समाजात मान मिळत नाही.
बोट दाखवणे	दोष देणे / आक्षेप घेणे	आपल्या कामात कोणालाही बोट दाखवायला जागा ठेवू नये.
मुग गिळून बसणे	न बोलता निमूटपणे शांत बसणे	सत्य माहीत असूनही तो न्यायालयात मुग गिळून बसला.

वाक्यप्रचार	अचूक अर्थ	वाक्यात उपयोग
रात्रंदिवस एक करणे	सतत व अतोनात परिश्रम करणे	एमपीएससी परीक्षेत यश मिळवण्यासाठी गणेशने रात्रंदिवस एक केले.
हात टेकणे	नाइलाज झाल्याने हार मानणे	त्या हट्टी मुलाला समजवून अखेर वडिलांनी हात टेकले.
हातभार लावणे	कामात मदत करणे	आईच्या घरकामात मुलांनी नेहमी हातभार लावला पाहिजे.
हातावर तुरी देणे	डोळ्यादेखत फसवून पळून जाणे	पोलिसांना चकवून कैद्याने हातावर तुरी दिली.
हुकमी एक्का	खात्रीशीर यश मिळवून देणारा माणूस किंवा उपाय	क्रिकेट सामन्यात जसप्रीत बुमराह हा भारतीय संघाचा हुकमी एक्का ठरला.

भाग २: संपूर्ण ५५०+ मराठी वाक्यप्रचार संग्रह (वर्णक्रमानुसार A-Z)

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
1	**, बोचणी लागणे**	एखादी गोष्ट मनाला लागून राहते
2	**अंग काढून घेणे**	संबंध तोडणे
3	**अंगद धरणे**	लठ्ठ होणे
4	**अंगाचा तिळपापड होणे**	अतिशय संताप येणे
5	**अंगाची लाही होणे**	खूप राग येणे
6	**अंगाला होणे**	अंगाला छान बसणे
7	**अंगावर काटा येणे**	भीती वाटणे
8	**अंगावर काटे उभे राहणे**	भीतीने अंगावर शहारे येणे
9	**अंगावर मूठभर मांस चढणे**	धन्यता वाटणे
10	**अंगी ताठा भरणे**	मग्रुरी करणे े
11	**अंथरूण पाहून पाय पसरणे**	एपती नुसार खर्च करणे
12	**अग्निदिव्य करण**	कठीण कसोटीला उतरणे
13	**अजरामर होणे**	कायमस्वरूपी टिकणे
14	**अटकेपार झेंडा लावणे**	फार मोठा पराक्रम गाजवला
15	**अट्टहास करणे**	आग्रह धरणे
16	**अठरा गुणांचा**	खंडोबा लबाड माणूस
17	**अठराविश्वे दारिद्र्य असणे**	पराकोटीचे दारिद्र्य असणे
18	**अडकित्त्यात सापडणे**	पेचात सापडणे
19	**अत्तराचे दिवे लावणे**	भरपूर उधळपट्टी करणे
20	**अनभिज्ञ असते**	एखाद्या विषयाचे मुळीच ज्ञान असणे
21	**अनमान करणे**	संकोच करणे
22	**अन्नास जागणे**	उपकाराची आठवण ठेवणे
23	**अन्नास मोताद होणे**	आत्यंतिक दारिद्र्यात जगणे
24	**अन्नास लावणे**	उपजीविकेचे साधन मिळवून देणे
25	**अपूर्व योग येणे**	दुर्मिळ योग येणे
26	**अप्रूप वाटणे**	आश्चर्य किंवा कौतुक वाटणे
27	**अभंग असणे**	अखंड असणे
28	**अभिलाषा धरणे**	एखाद्या गोष्टीची इच्छा बाळगणे
29	**अमलात आणणे**	कारवाई करणे
30	**अर्धचंद्र देणे**	हकालपट्टी करणे
31	**अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणे**	थोड्याशा यशाने चढून जाणे
32	**अवाक होणे**	आश्चर्यचकित होण
33	**आंदण देणे**	देऊन टाकणे

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
34	**आंबून जाणे**	भेटून जाणे थकणे विपर्यास होणे
35	**आकांडतांडव करणे**	रागाने आदळआपट करणे
36	**आकाश ठेंगणे होणे**	अतिशय आनंद होणे
37	**आकाश पाटणे**	चारी बाजूंनी संकटे येणे
38	**आकाश पाताळ एक करणे**	फार मोठ्याने आरडाओरड करून थैमान घालने
39	**आकाशाची कुराड**	आकस्मिक संकट
40	**आकाशाला गवसणी घालने**	आवाक्याबाहेरची गोष्ट करण्याचा प्रयत्न करणे
41	**आखाडे बांधणे**	मनात आराखडा किंवा अंदाज करणे
42	**आगीत तेल ओतणे**	भांडण किंवा वाद विकोपाला जाईल असे करणे
43	**आज लागणे**	झळ लागणे
44	**आड येणे**	अडथळा निर्माण करणे
45	**आतल्या आत कुढणे**	मनातल्या मनात दुःख करणे
46	**आत्मसात करणे**	मिळवणे अंगी बाणवणे
47	**आपल्या पोळीवर तूप ओढणे**	स्वतःचा फायदा करून घेणे
48	**आभाळ कोसळणे**	एकाएकी फार मोठे संकट येणे
49	**आभाळाला कवेत घेणे**	मोठे काम साध्य करणे
50	**आयोजित करणे**	सिद्धता करणे प्रभावित होणे
51	**आवर्जून पाहणे**	मुद्दामहून पाहण
52	**इतिश्री करणे**	शेवट करणे
53	**उंटावरून शेळ्या हाकणे**	मनापासून काम न करणे दूरवरून निर्देश देणे स्वतः सामील न होता सल्ले देणे
54	**उंबराचे फूल**	क्वचित भेटणारी व्यक्ती
55	**उखळ पांढरे होणे**	पुष्कळ फायदा होणे
56	**उखाळ्या-पाखाळ्या काढणे**	एकमेकांची उणीदुणी काढणे किंवा दोष देणे
57	**उचलबांगडी करणे**	एखाद्याला जबरदस्तीने हलवणे
58	**उच्छाद मांडला**	धिंगाना घालने
59	**उताणा पडणे**	पराभूत होणे
60	**उताणे पडणे**	पराभूत होणे
61	**उत्पात करणे**	विध्वंस करणे
62	**उदक सोडले**	एखाद्या वस्तूवरील आपला हक्क सोडून देणे
63	**उदास होणे**	खिन्न होणे
64	**उदास होने**	खिन्न होणे
65	**उध्वस्त होणे**	नाश पावणे
66	**उन्मळून पडणे**	मुळासकट कोसळणे
67	**उन्हाची लाही फुटणे**	अतिशय कडक ऊन पडणे
68	**उपोषण करणे**	लंघन करणे उपाशी राहणे

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
69	**उराशी बाळगणे**	मनात जतन करुन ठेवणे
70	**उलटी अंबारी हाती येणे**	भीक मागण्याची पाळी येणे
71	**उष्टे हाताने कावळा न हाकण**	कधी कोणाला यत्किंचितही मदत न करणे
72	**उसंत मिळणे**	वेळ मिळणे
73	**उसने बळ आणणे**	खोटी शक्ती दाखविणे
74	**उसने बळ आनने**	खोटी शक्ती दाखविणे
75	**ऊहापोह करणे**	सर्व बाजूंनी चर्चा करून साधकबाधक विचार करणे
76	**एक घाव दोन तुकडे करणे**	ताबडतोब निर्णय घेऊन गोष्ट निकालात काढणे
77	**ओक्साबोक्शी रडणे**	मोठ्याने आवाज करत रडणे
78	**ओढा असणे**	कल असणे
79	**कंठशोष करण**	ओरडून गळा सुकवणे उगाच घसाफोड करून खूप समजावून सांगणे े
80	**कंठस्नान घालने**	ठार मारणे
81	**कंपित होणे**	कापणे थरथरणे
82	**कंबर कसणे**	एखाद्या गोष्टीसाठी हिम्मत करून तयार होणे
83	**कच्छपी लागणे**	नादी लागणे
84	**कट करणे**	सख्य नसणे मैत्री नसणे
85	**कटाक्ष असणे**	कल असणे
86	**कणव असणे**	आस्था किंवा करून असणे
87	**कणिक तिंबणे**	खूप मार देणे
88	**कपाळ फुटणे**	दुर्दैव ओढवणे
89	**कपाळमोक्ष होणे**	मरण पावणे
90	**कसं लावणे**	सामर्थ्य पणाला लावणे
91	**कसून मेहनत करणे**	खूप नेटाने कष्ट करणे
92	**कहर करणे**	अतिरेक करणे
93	**काका वर करणे**	आपल्याजवळ काही नाही असे दाखवणे
94	**कागदी घोडे नाचवणे**	लेखनात शूरपणा दाखविणे
95	**काट्याचा नायटा होणे**	शुल्लक गोष्टीचा भयंकर परिणाम होणे
96	**काट्याने काटा काढणे**	का शत्रूच्या सहाय्याने दुसऱ्या शत्रूचा पराभव करणे
97	**काण फुंकणे**	दुसऱ्याच्या मनात किल्मिष निर्माण करणे
98	**कात्रीत सापडणे**	दोन्ही बाजूंनी संकटात सापडले
99	**कानउघाडणी करणे**	क** शब्दात चूक दाखवून देणे
100	**कानशिलं ची भाजी होणे**	मारून मारून कानशिलांच्या आकार बदलणे
101	**कानाडोळा करणे**	दुर्लक्ष करणे
102	**कानावर हात ठेवणे**	माहीत नसल्याचा बहाणा करणे
103	**कापरे सुटणे**	घाबरल्यामुळे थरथरणे

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
104	**कायापालट होणे**	स्वरूप पूर्णपणे बदलणे
105	**कारवाया करणे**	कारस्थाने करणे
106	**कावरा बावरा होणे**	बाबरने
107	**काळजाचे पाणी पाणी होणे**	अति दु:खाने मन विदारण होणे
108	**काळीज उडणे**	भीती वाटणे
109	**काळ्या दगडावरची रेघ**	खोटे न ठरणारे शब्द
110	**किरकिर करणे**	एखाद्या गोष्टीबाबत सतत तक्रार करणे
111	**कुंपणानेच शेत खाणे**	ज्यांच्यावर जबाबदारी आहे अशा विश्वासातील माणसाने फसवणे
112	**कुणकुण लागणे**	चाहूल लागणे
113	**कुत्रा हाल न खाणे**	अतिशय वाईट स्थिती येणे
114	**कूच करने**	वाटचाल करणे
115	**केसाने गळा कापणे**	वरकरणी प्रेम दाखवून कप्तान एखाद्याचा घात करणे
116	**कोंबडे झुंजवणे**	दुसऱ्यांचे भांडण लावून आपण मजा पाहणे
117	**कोडकौतुक होणे**	लाड होणे
118	**कोपरापासून हात जोडणे**	काही संबंध न राहण्याची इच्छा प्रकट करणे
119	**खंड न पडणे**	एखादे कार्य करताना मध्ये न थांबणे
120	**खडा टाकून पहाणे**	अंदाज घेणे
121	**खडे चारणे**	शरण येण्यास भाग पाडणे
122	**खडे फोडणे**	दोष देणे
123	**खसखस पिकणे**	मोठ्याने हसणे
124	**खळखळ करणे**	नाखुशीने सतत नकार देणे टाळाटाळ करणे
125	**खाजवुन खरुज काढणे**	मुद्दाम भांडण करू उकरून काढणे
126	**खापर फोडणे**	एखाद्यावर निष्कारण ठपका ठेवणे
127	**खायचे वांदे होणे**	उपासमार होणे खायला न मिळणे
128	**खाल्ल्याघरचे वासे मोजणे**	उपकार करणार याचे वाईट चिंतेने
129	**खितपत पडणे**	क्षीण होत जाणे
130	**खूणगाठ बांधणे**	निश्चय करणे
131	**खो घालने**	विघ्न निर्माण करणे
132	**गंगेत घोडे न्हाने**	कार्य तडीस गेल्यावर समाधान वाटणे
133	**गट्टी जमणे**	दोस्ती होणे
134	**गढून जाणे**	मग्न होणे गुंग होणे
135	**गर्भगळीत होणे**	अतिशय घाबरणे
136	**गळ घालने**	अतिशय आग्रह करणे
137	**गळ्यात धोंड पडणे**	तिचं असताना जबाबदारी अंगावर पडणे
138	**गळ्यात पडणे**	एखाद्याला खूपच भीड घालने

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
139	**गळ्यातील ताईत**	अतिशय प्रिय
140	**गळ्याशी येणे**	नुकसानीबाबत अतिरेक होणे
141	**गाजावाजा करणे**	खूप प्रसिद्धी मिळविण्याचा प्रयत्न करणे
142	**गाजावाजा करने**	प्रसिद्धी मिळविण्याचा प्रयत्न करणे
143	**गाडी पुन्हा रुळावर येणे**	चुकीच्या मार्गावरून पुन्हा पूर्ववत मार्ग योग्य मार्गाला येणे
144	**गाशा गुंडाळणे**	एकाएकी निघून जाणे एकदम पसार होणे
145	**गुजराण करणे**	निर्वाह करणे
146	**गुण दाखवणे**	निर्गुण दाखवून दुर्गुण दाखवणे
147	**गुण्यागोविंदाने लहाने**	प्रेमाने एकत्र रहाणे
148	**गुमान काम करणे**	निमूटपणे काम करणे
149	**ग्राह्य धरणे**	योग्य आहे असे समजणे
150	**घडी भरणे**	विनाश काळ जवळ येऊन ठेपणे
151	**घर डोक्यावर घेणे**	अतिशय गोंगाट करणे
152	**घर धुवून नेणे**	सर्वस्वी लुबाडणे
153	**घाम गाळणे**	खूप कष्ट करणे
154	**घालून-पाडून बोलणे**	दुसऱ्याच्या मनाला लागेल असे बोलणे
155	**घोकंपट्टी करणे**	अर्थ लक्षात न घेता केवळ पाठांतर करणे
156	**घोडे पुढे धामटणे**	स्वतःच्या फायद्यासाठी पुढे सरसावणे
157	**घोडे पेंड खाणे**	अडचण निर्माण होणे े
158	**घोडे मारणे**	नुकसान करणे
159	**चक्कर मारणे**	फेरफटका मारणे
160	**चतुर्भुज होणे**	लग्न करणे
161	**चार पैसे गाठीला बांधणे**	थोडीफार बचत करणे
162	**चारी दिशा मोकळ्या होणे**	पूर्ण स्वातंत्र्य मिळणे
163	**चाहूल लागणे**	मागोवा लागणे
164	**चिंता वाहने**	आस्था असणे
165	**चितपट करणे**	कुस्ती हरविणे
166	**चित्त विचलित होणे**	मूळ विषयाकडे लक्ष दुसरीकडे जाणे
167	**चुरमुरे बाळा खात बसणे**	खजील होणे
168	**चेहरा खोलने**	आनंद होणे
169	**चौदावे रत्न दाखवणे**	मार देणे
170	**छातीत धस्स देशी गोळा येणे**	अचानक खूप घाबरणे
171	**छाननी करणे**	तपास करणे
172	**छाप पडणे**	परिसीमा गाठणे प
173	**छोटे शाई चालवणे**	दांडगाई करणे

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
174	**जंग जंग पछाडणे**	निरनिराळ्या रीतींनी प्रयत्न करणे कमालीचा प्रयत्न करणे
175	**जम बसने**	स्थिर होणे
176	**जमीनदोस्त होणे**	पूर्णपणे नष्ट होणे
177	**जळफळाट होणे**	रागाने लाल होणे
178	**जिभेला हाड नसणे**	वाटेल ते बेजबाबदार पणे बोलणे जिवात जिव येणे काळजी नाहीशी होऊन पुन्हा धैर्य येणे
179	**जिव थोडा थोडा होणे**	अतिशय काळजी वाटणे
180	**जिवाचे रान करणे**	खूप कष्ट सोसणे
181	**जिवावर उठणे**	जीव घेण्यास उद्युक्त होणे
182	**जीव अधीर होणे**	उतावीळ होणे
183	**जीव की प्राण असणे**	प्राणाइतके प्रिय असणे
184	**जीव खाली पडणे**	काळजी मुक्त होणे
185	**जीव गहाण ठेवणे**	कोणत्याही त्यागास तयार असणे
186	**जीव टांगणीला लागणे**	चिंताग्रस्त होणे
187	**जीव भांड्यात पडणे**	काळजी दूर होणे
188	**जीव मेटाकुटीस येणे**	त्रासाने अगदी कंटाळून झाली
189	**जीव मोठीच धरणे**	मन घट्ट करणे
190	**जीव वरखाली होणे**	घाबरणे
191	**जीवाची मुंबई करणे**	अतिशय चैनबाजी करणे
192	**जीवाला घोर लागणे**	खूप काळजी वाटणे
193	**जीवावर उड्या मारणे**	दुसऱ्यावर अवलंबून राहून चैन करणे
194	**जीवावर उदार होणे**	प्राण देण्यास तयार होणे
195	**जोपासना करणे**	काळजीपूर्वक संगोपन करणे
196	**ज्याचे नाव ते असणे**	उपमा देण्यात उदाहरण नसणे
197	**झळ लागणे**	थोडाफार दुष्परिणाम भोगावा लागणे
198	**झाकले माणिक**	साधा पण गुणी मनुष्य
199	**झुंज देणे लढा देणे**	संघर्ष करणे
200	**टक लावून पाहणे**	एकसारखे रोखून पाहणे
201	**टाके ढीले होणे**	अतोनात श्रम झाल्यामुळे अंगी ताकत न रहाणे
202	**टाहो फोडणे**	मोठ्याने आकांत करणे
203	**टिकाव लागणे**	निभाव लागणे
204	**टेंभा मिरविणे**	दिमाख दाखवणे
205	**ठसा उमटवणे**	छाप पाडणे
206	**ठाण मांडणे**	एका जागेवर बसून राहणे
207	**डांगोरा पिटणे**	जाहीर वाच्यता करणे

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
208	**डाव येणे**	खेळात राज्य येणे
209	**डाव साधने**	संधीचा फायदा घेऊन कार्य साधने योजलेल्या युक्तीने इष्ट वस्तू मिळविणे
210	**डाळ शिजणे**	थारामानी मिळणे आणि सोया जुळणे मनाजोगे काम होणे
211	**डोके खाजविणे**	एखाद्या गोष्टीचा विचार करणे
212	**डोक्यावर खापर फोडणे**	एखाद्यावर निष्कारण ठपका ठेवणे
213	**डोक्यावर घेणे**	अति लाड करणे
214	**डोक्यावर मिरी वाटणे**	वरचढ होणे
215	**डोळा चुकवणे**	अपराधी भावनेमुळे नजरेला नजर देणं टाळणे
216	**डोळे खिळून राहणे**	एखाद्या गोष्टीकडे सारखे बघत राहणे
217	**डोळे दिपवले**	थक्क करून सोडले
218	**डोळे निवणे**	समाधान होणे
219	**डोळे फाडून पहाणे**	तीक्ष्ण नजरेने पाहणे आश्चर्यचकित होऊन पाहणे
220	**डोळे फिरले**	खूप घाबरणे
221	**डोळे भरून पहाणे**	समाधान होईपर्यंत पाहाने
222	**डोळे लावून बसणे**	खूप वाट पाहणे
223	**डोळे वटारणे**	रागाने बघणे
224	**डोळ्यांचे पारणे फिटणे**	पूर्ण समाधान होणे
225	**डोळ्यांत खुपणे**	सहन न होणे
226	**डोळ्यांवर कातडे ओढणे**	जाणून बुजून दुर्लक्ष करणे
227	**डोळ्यात तेल घालून रहाणे**	अतिशय जागृत रहाणे
228	**डोळ्यात धूळ फेकणे**	फसवणूक करणे
229	**डोळ्यात प्राण आणणे**	एखाद्या गोष्टीसाठी अतिशय आतुर होणे
230	**डोळ्याला डोळा न भिडवणे**	घाबरून नजर न देणे
231	**तगादा लावणे**	पुन्हा पुन्हा मागणी करणे
232	**तगून राहणे**	मुखोद्गत असणे
233	**तजवीज करणे**	तरतूद करणे
234	**तडीस नेणे**	पूर्ण करणे
235	**तळपायाची आग मस्तकात जाणे**	अतिशय संताप होणे
236	**तळहातावर शीर घेणे**	जीवावर उदार होणे
237	**ताट वाढणे**	जेवायला वाढणे
238	**ताटकळत उभे राहणे**	वाट पाहणे
239	**तारांबळ उडणे**	अतिशय घाई होणे
240	**तारांबळ होणे**	घाईगडबड होणे
241	**ताळ्यावर आनने**	योग्य समज देणे
242	**तिलांजली देणे**	सोडणे त्याग करणे

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
243	**तोंड काळे करणे**	दृष्टीआड होणे नाहीसे होणे
244	**तोंड ढाकणे**	बोलणे
245	**तोंड देणे**	मुकाबला करणे सामना करणे
246	**तोंड भरून बोलणे**	खूप स्तुती करणे
247	**तोंडचे पाणी पळणे**	अतिशय घाबरले भयभयीत होणे
248	**तोंडात बोट घालने**	आश्चर्यचकित होणे
249	**तोंडाला पाणी सुटणे**	लालसा उत्पन्न होणे
250	**तोंडाला पाने पुसणे**	फसवणे
251	**तोंडावाटे ब्र न काढणे**	एकही शब्द न उच्चारणे
252	**तोंडीलावणे**	जेवताना चाखण्यासाठी एखादा पदार्थ देणे
253	**तोंडून अक्षरं न फुटणे**	घाबरून न बोलणे
254	**त्राटिका**	कजाग बायको
255	**थांब न लागणे**	कल्पना न येणे
256	**थुंकी झेलणे**	खुशामत करण्यासाठी लाचारी पत्करणे
257	**दगडावरची रेघ**	खोटे न ठरणारे शब्द
258	**दगा देणे**	फसवणे
259	**दडी मारणे**	लपून राहणे
260	**दत्त म्हणून उभे राहणे**	एकाएकी हजर होणे
261	**दप्तरी दाखल होणे**	संग्रही जमा होणे
262	**दबा धरून बस**	णे टपून बसणे
263	**दक्षता घेणे**	काळजी घेणे
264	**दाढी धरणे**	विनवणी करणे
265	**दात ओठ खाणे**	द्वेषाची भावना दाखवणे
266	**दात धरणे**	वैर बाळगणे
267	**दातखिळी बसणे**	बोलणे अवघड होणे
268	**दातांच्या कन्या करणे**	अनेक वेळा विनंती करून सांगणे
269	**दातास दात लावून बसणे**	काही न खातो उपाशी राहणे
270	**दाती तृण धरणे**	शरणागती पत्करणे
271	**दाद मागणे**	तक्रार करून किंवा गाऱ्हाणे सांगून न्याय मागणे
272	**दिशा फुटेल तिकडे पडणे**	सैरावैरा पळणे
273	**दिस बुडून जाणे**	सूर्य मावळणे
274	**दुःखावर डागण्या देणे**	झालेल्या माणसाला वाईट वाटेल असे बोलून आणखी दुःख देणे धरणे धरणे हट्ट धरून बसणे
275	**दुमदुमून जाणे**	निनादून जाणे
276	**दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणे**	दुसऱ्याच्या तंत्राने किंवा सल्ल्याने चालणे

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
277	**देखभाल करणे**	जतन करणे
278	**देखरेख करणे**	राखण करणे
279	**देणे-घेणे नसणे**	संबंध नसणे
280	**देहातून प्राण जाणे**	मरण येणे
281	**दोन हातांचे चार हात होणे**	विवाह होणे
282	**द्राविडी प्राणायाम करणे**	सोपा मार्ग सोडून कठीण मार्गाने जाणे
283	**धडपड करणे**	खूप कष्ट करणे
284	**धडा करणे जिवाच्या धडा करणे**	पक्का निश्चय करणे
285	**धन्य होणे**	कृतार्थ होणे
286	**धाबे दणाणणे**	खूप घाबरणे
287	**धारवाडी काटा**	बिनचूक वजनाचा काटा
288	**धारातीर्थी पडणे**	रणांगणावर मृत्यू येणे
289	**धिंडवडे निघणे**	फजिती होणे
290	**धुडगूस घालने**	गोंधळ घालून करणे
291	**धूम ठोकणे**	वेगाने पळून जाणे
292	**धूळ चारणे**	पूर्ण पराभव करणे
293	**नक्राश्रू ढाळण**	अंतर्यामी आनंद होत असताना बाह्यतः दु:ख दाखवणे
294	**नक्शा उतरवणे**	गर्व उतरवणे
295	**नजर करणे**	भेटवस्तू देणे े
296	**नजर वाकडी करणे**	वाईट हेतू बाळगणे
297	**नजरेत भरणे**	उठून दिसणे
298	**नसती बिलामत येणे नसती कटकट ओढणे पिंक टाकणे थुंकणे सख्या नसणे**	प्रेमळ नाते नसणे े
299	**नांगी टाकणे**	हातपाय गाळणे
300	**नाक ठेचणे**	नक्शा उतरवणे
301	**नाक मुठीत धरणे**	अगतिक होणे
302	**नाक मुरडणे**	नापसंती दाखवणे
303	**नाकाने कांदे सोलणे**	स्वतःचे दोष असूनही उगाच बढाया मारणे
304	**नाकाला मिरच्या झोंबणे**	एखाद्याचे वर्म काढल्यामुळे त्याला राग येणे
305	**नाकावर राग असणे**	लवकर चिडणे
306	**नाकाशी सूत धरणे**	आता मरतो की घटकेने मरतो अशी स्थिती निर्माण होणे
307	**नाकी नऊ येणे**	मेटाकुटीला येणे फार त्रास होणे
308	**नाद घासणे**	स्वतःची कार्य साधण्यासाठी दुसऱ्याचे पाय धरणे
309	**नाव कमावणे**	कीर्ती मिळवणे
310	**नाव मिळवणे**	कीर्ती मिळवणे

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
311	**नाळ तोडणे**	संबंध तोडणे
312	**निद्राधीन होणे**	झोपणे
313	**निवास करने**	रहाणे
314	**निष्प्रभ करणे**	महत्व कमी करणे
315	**निक्षून सांगणे**	स्पष्टपणे सांगणे
316	**नूर पातळ होणे**	रूप उतरणे
317	**पडाव पडणे**	वस्ती करणे
318	**पदरमोड करणे**	दुसऱ्यासाठी स्वतःचा पैसा खर्च करणे
319	**पदरात घालने**	सुख पटवून देणे स्वाधीन करणे
320	**पदरात घेणे**	स्वीकारणे
321	**पदरी घेणे**	स्वीकार करणे
322	**पराचा कावळा करणे**	मामुली गोष्टीला भलतेच महत्त्व देणे
323	**परिपाठ असणे**	विशिष्ट पद्धत असणे नित्यक्रम असणे
324	**पहारा देणे**	राखण करणे
325	**पाऊल वाकडे पडणे**	वाईट मार्गाने जाणे
326	**पाचवीला पुजणे**	त्रासदायक गोष्टींची कायमची सोबत असणे
327	**पाचवीला पूजले**	एखादी गोष्ट जन्मापासून असणे
328	**पाठ दाखवणे**	पळून जाणे
329	**पाठ न सोडणे**	एखाद्या गोष्टीचा पिच्छा पुरवणे
330	**पाठिंबा देणे**	दुजोरा देणे
331	**पाठीशी घालने**	संरक्षण देणे
332	**पाढा वाचणे**	सविस्तर हकीकत सांगणे
333	**पाणी पडणे**	वाया जाणे
334	**पाणी पाजणे**	पराभव करणे
335	**पाणी मुरणे**	कपटाने काहीतरी लपवून ठेवणे गुप्त कट शिजवत असणे
336	**पाणी सोडणे**	आशा सोडणे
337	**पाण्यात पाहणे**	अत्यंत द्वेष करणे
338	**पादाक्रांत करणे**	जिंकणे
339	**पायमल्ली करणे**	उपमर्द करणे
340	**पायाखाली घालने**	पादाक्रांत करणे
341	**पार पाडणे**	पूर्ण करणे
342	**पाहुणचार करणे**	आदरातिथ्य करणे
343	**पाळत ठेवणे**	लक्ष ठेवणे
344	**पाळी येणे**	वेळे येणे
345	**पुंडाई करणे**	दांडगाईने वागणे

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
346	**पुढाकार घेणे**	नेतृत्व करणे
347	**पुनरुज्जीवन करणे**	पुन्हा उपयोगात आणणे
348	**पोटाची damdi वळणे**	खायला न मिळणे
349	**पोटात कावळे काव काव करणे**	अतिशय भूक लागणे
350	**पोटात घालने**	क्षमा करणे
351	**पोटात ठेवणे**	गुप्तता ठेवणे
352	**पोटात ब्रह्मराक्षस उठणे**	खूप खावेसे वाटणे
353	**पोटात शिरणे**	मर्जी संपादन करणे
354	**पोटाला चिमटा घेणे**	पोटाला न खाता राहणे
355	**पोटावर पाय देणे**	उदर निर्वाहाचे साधन काढून
356	**प्रघात पडणे**	रीत असणे
357	**प्रचारात आणणे**	जाहीरपणे माहिती देणे
358	**प्रतिकार करणे**	विरोध करणे
359	**प्रतिबंध करणे**	अटकाव करणे
360	**प्रतिष्ठान लाभणे**	मान मिळवणे
361	**प्रतिष्ठापीत करणे**	स्थापना करणे
362	**प्रत्यय येणे**	प्रचीती येणे
363	**प्रश्नांची सरबत्ती करणे**	एक सारखे प्रश्न विचारणे
364	**प्रस्ताव ठेवणे**	ठराव मांडणे
365	**प्रक्षेपित करणे**	प्रसारित करणे
366	**प्राण कानात गोळा करणे**	ऐकण्यासाठी अतिशय उत्सुक होणे
367	**प्राणाला मुकले**	जीव जाणे मरण येणे
368	**प्राणावर उदार होणे**	जिवाची पर्वा न करणे
369	**प्राप्त करणे**	मिळवणे
370	**प्रेरणा मिळणे**	स्फूर्ती मिळणे
371	**फंदात न पडणे**	भानगडीत न अडकणे
372	**फटफटती सकाळ होणे**	पोटात कावळे ओरडत भुकेने व्याकूळ होणे
373	**फाटे फोडणे**	उगाच अडचणी निर्माण करणे
374	**फिदा होणे**	खुश होणे
375	**फुटाण्यासारखे उडणे**	झटकन राग येणेवाक्प्रचार
376	**बट्ट्याबोळ होणे**	विचका होणे
377	**बडेजाव वाढवणे**	प्रौढी मिरवणे
378	**बत्तर बाळ्या होणे**	चिंध्या होणे नासधूस होणे
379	**बत्तीशी रंगवणे**	जोराने थोबाडीत मारणे
380	**बस्तान ठोकणे**	मुक्काम ठोकणे

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
381	**बस्तान बसणे**	पसंती मिळणे अनुकूलता लाभणे
382	**बस्ती घेणे**	धक्का घेणे घाबरणे
383	**बहिष्कार टाकणे**	वाळीत टाकणे नकार देणे
384	**बळ लावणे**	शक्ती खर्च करणे
385	**बांधणी करणे**	रचना करणे
386	**बाजार गप्पा**	निंदानालस्ती
387	**बादरायण संबंध असणे**	ओढून ताणून लावलेला संबंध असणे
388	**बाबरने**	गोंधळणे
389	**बारा गावचे पाणी पिणे**	विविध प्रकारचे अनुभव घेणे
390	**बारा वाजले**	पूर्ण नाश होणे
391	**बाहू स्फुरण पावणे**	स्फूर्ती येणे
392	**बुचकळ्यात पडणे**	गोंधळून जाणे
393	**बेत आखणे**	योजना आखणे
394	**बेत करणे**	योजना आखणे
395	**बेत हाणून पाडणे**	बेत सिद्धीला जाऊ न देणे
396	**बोटावर नाचवणे**	आपल्या इच्छेप्रमाणे दुसऱ्याला वागायला लावणे
397	**बोल लावणे**	दोष देणे
398	**बोलाफुलाला गाठ पडणे**	दोन गोष्टींची सहजासहजी एक वेळ जमून येणे
399	**बोळ्याने दूध पिणे**	बुद्धिहीन असणे
400	**ब्रम्हा करणे**	बोभाटा करणे सगळीकडे प्रसिद्ध करणे
401	**ब्रह्म करणे**	भटकंती करणे
402	**भंडावून सोडले**	त्रास देणे
403	**भगीरथ प्रयत्न करणे**	चिकाटीने प्रयत्न करणे
404	**भडभडून येणे**	हुंदके देणे गलबलले
405	**भर असणे**	जोर असणे
406	**भरभराट होणे**	प्रगती होणे समृद्धी होणे
407	**भाऊबंदकी असणे**	ना त्यांना त्यात भांडण असणे
408	**भान ठेवणे**	जाणीव ठेवणे
409	**भान नसणे**	जाणीव नसणे
410	**भानावर येणे**	परिस्थितीची जाणीव होणे शुद्धीवर येणे
411	**भारून टाकणे**	पूर्णपणे मोहून टाकणे
412	**मती गुंग होणे**	आश्चर्य वाटणे
413	**मत्सर वाटणे**	काळजी घेणे
414	**मधाचे बोट लावणे**	आशा दाखवणे
415	**मधून विस्तव न जाणे**	अतिशय वैर असणे

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
416	**मन सांशक होणे**	मनात संशय वाटू लागणे
417	**मनात घर करणे मनात कायमचे राहणे मन मोकळे करणे**	सुखदु:खाच्या गोष्टी बोलून दाखविणे
418	**मनात मांडे खाणे**	व्यर्थ मनोराज्य करणे
419	**मनाने घेणे**	मनात पक्का विचार येणे
420	**मनावर ठसण**	मनावर जोरदारपणे बिंबणे
421	**मनावर बिंबवणे**	मनावर ठसवणे
422	**मनोरथ पूर्ण होणे**	इच्छा पूर्ण होणे
423	**मराठी भरारी मारणे**	झेप घेणे
424	**मशागत करणे**	मेहनत करून निगा राखणे
425	**मागमूस नसणे**	थांगपत्ता नसणे
426	**मात करणे**	विजय मिळवणे
427	**मात्रा चालणे**	योग्य परिणाम होणे
428	**मान्यता पावणे**	सिद्ध होणे
429	**माशा मारणे**	कोणताही उद्योग न करणे
430	**माशी शिंकणे**	अडथळा येणे
431	**मिनतवारी करणे**	दादा पुता करणे
432	**मिशांना तूप लावणे**	उगीच ऐट दाखवणे
433	**मिशीवर ताव मारणे**	बढाई मारणे
434	**मूग गिळणे**	उत्तर न देता गप्प राहणे
435	**मोहाला बळी पडणे**	एखाद्या गोष्टीच्या आसक्ती मध्ये वाहून जाणे
436	**यक्षप्रश्न असणे**	महत्त्वाची गोष्ट असणे
437	**रक्ताचे पाणी करणे**	अतिशय मेहनत करणे
438	**रवाना होणे**	निघून जाणे
439	**रस असणे**	अत्यंत आवड असणे
440	**रक्षणाची काळजी घेणे**	योगक्षेम चालविणे
441	**राईचा पर्वत करणे**	शुल्लक गोष्टीला उगाच मोठे स्वरूप देणे
442	**राकोटीला जाणे**	काळ्यापाण्याची शिक्षा मरेपर्यंत कैद होणे
443	**राख होणे**	पूर्णपणे नष्ट होणे
444	**राब राब राबणे**	सतत खूप मेहनत करणे
445	**राबता असणे**	सतत ये-जा असणे
446	**राम नसणे**	अर्थ नसणे
447	**राम म्हणणे**	शेवट होणे मृत्यू येणे
448	**रियाज करणे**	सराव करणे
449	**रुची निर्माण होणे**	गोडी निर्माण होणे
450	**रोज ठेवणे चिडणे**	नाराजी असणे

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
451	**ललकारी देणे**	जयघोष करणे
452	**लवलेश नसणे**	जराही पत्ता नसणे जराही न होणे
453	**लष्कराच्या भाकऱ्या भाजणे**	दुसऱ्यांच्या उठाठेवी करणे
454	**लष्टक लावणे**	झंझट लावणे निकड लावणे
455	**लहान तोंडी मोठा घास घेणे**	आपणास न शोभेल अशाप्रकारे वरचढपणा दाखवणे
456	**लळा लागणे**	ओढ वाटणे
457	**लक्ष वेधून घेणे**	लक्ष ओढून घेणे
458	**लक्ष्मीचा वरदहस्त असणे**	लक्ष्मीची कृपा असणे श्रीमंती असणे
459	**लांछनास्पद असणे**	लाजिरवाणी असणे
460	**लौकिक मिळवणे**	सर्वत्र मान मिळवणे
461	**वंचित रहाणे**	एखादी गोष्ट न मिळणे
462	**वकील पत्र घेणे**	एखाद्याची बाजू घेणे
463	**वजन पडणे**	प्रभाव पडणे
464	**वठणीवर आणणे**	ताळ्यावर आणणे
465	**वड्याचे तेल वांग्यावर काढणे**	एकाचा राग दुस-यावर काढणे
466	**वणवण भटकणे**	एखादी गोष्ट मिळविण्यासाठी खूप फिरणे
467	**वनवन करणे**	खूप भटकणे
468	**वरदान देणे**	कृपाशीर्वाद देणे
469	**वाचा बंद होणे**	तोंडातून एक शब्दही बाहेर न पडणे
470	**वाचा बसणे**	एक शब्द येईल बोलता न येणे
471	**वाट तुडवणे**	रस्ता कापणे
472	**वाट लावणे**	विल्हेवाट लावणे मोडून तोडून टाकणे
473	**वाटाण्याच्या अक्षता लावणे**	स्पष्टपणे नाकारले
474	**वारसा देणे**	वडिलोपार्जित हक्क सोपवणे
475	**वाऱ्यावर सोडणे**	अनाथ करणे
476	**विचलित होणे**	मनाची चलबिचल होणे
477	**विडा उचलणे**	निश्चय किंवा प्रतिज्ञा करणे
478	**विदीर्ण होणे**	भग्न होणे मोडतोड होणे
479	**विरस होणे**	निराशा होणे उत्साहभंग होणे
480	**विरोध दर्शवणे**	प्रतिकार करणे
481	**विसंवाद असणे**	एकमेकांशी न जमणे
482	**विसावा घेणे**	विश्रांती घेणे
483	**विहरणे**	संचार करणे
484	**वेड घेऊन पेडगावला जाणे**	मुद्दाम ढोंग करणे
485	**वेसन घालने**	मर्यादा घालने

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
486	**व्रत घेणे**	वसा घेणे
487	**शंभर वर्ष भरणे**	नाश होण्याची वेळी घेणे
488	**शब्द जमिनीवर पडू न देणे**	दुसऱ्याच्या इच्छेनुसार लगेच कार्यवाही करणे
489	**शहानिशा करणे**	एखाद्या गोष्टीबाबत चौकशी करून खात्री करून घेणे
490	**शिगेला पोचणे**	शेवटच्या टोकाला जाणे
491	**श्रीगणेशा करणे**	आरंभ करणे
492	**संधान बांधने**	जवळीक निर्माण करणे
493	**संपवणे**	संपन्न होणे
494	**संभ्रमात पडणे**	गोंधळात पाडणे
495	**संभ्रमित होणे**	गोंधळणे
496	**सपाटा लावणे**	एक सारखे वेगात काम करणे
497	**समजूत काढणे**	समजावणे हेवा वाटणे
498	**समरस होणे**	गुंग होणे
499	**सर्वस्व पणाला लावणे**	सर्व शक्य मार्गांचा अवलंब करणे
500	**सहभागी होणे**	सामील होणे
501	**सही ठोकणे**	निश्चित करणे
502	**सहीसलामत सुटणे**	दोष न येता सुटका होणे
503	**सांगड सांगड घालने**	मेळ साधने
504	**सांजावने**	संध्याकाळ होणे
505	**साखर पेरणे**	गोड गोड बोलून आपलेसे करणे
506	**साद घालने**	मनातल्या मनात दु:ख करणे
507	**सामोरे जाणे**	निधड्या छातीने संकटास तोंड देणे
508	**सारसरंजाम असणे**	सर्व साहित्य उपलब्ध असणे हाडीमांसी भिनने अंगात मुरणे
509	**साशंक होणे**	शंका येणे
510	**साक्षर होणे**	लिहिता-वाचता येणे
511	**साक्षात्कार होणे**	आत्मिक ज्ञान प्राप्त होणे खरेखुरे स्वरूप कळणे
512	**सुताने स्वर्गाला जाण**	थोडा सुगावा लागताच संपूर्ण गोष्टीचे स्वरूप तर्काने जाणण्याचा प्रयत्न करणे
513	**सुळकांडी मारणे**	सूर मारणे
514	**सूड घेणे**	बदला घेणे
515	**सूतोवाच करणे**	पुढे घडणाऱ्या गोष्टींची प्रस्तावना करणे
516	**सोन्याचे दिवस येणे**	अतिशय चांगले दिवस येणे
517	**स्तंभित होणे**	आश्चर्याने स्तब्ध होणे
518	**स्वप्न भंगणे**	मनातील विचार कृतीत न येणे
519	**स्वर्ग दोन बोटे उरणे**	आनंदाने गर्वाने अतिशय फुगून जाणे
520	**हंबरडा फोडणे**	मोठ्याने रडणे

अ.क्र.	वाक्यप्रचार	अर्थ
521	**हट्टाला पेटणे**	मुळीच हट्ट न सोडणे
522	**हमरीतुमरीवर येणे**	जोराने भांडू लागणे
523	**हरभऱ्याच्या झाडावर चढणे**	खोटी स्तुती करून मोठेपणा देणे
524	**हवालदील होणे**	हताश होणे
525	**हशा पिकणे**	हास्य स्फोट होणे
526	**हसता हसता**	पोट दुखणे खूप हसणे
527	**हसता हसता पुरेवाट होणे**	अनावर हसू येणे
528	**हस्तगत करणे**	ताब्यात घेणे
529	**हाऊस मागवणे**	आवड पुरवून घेणे
530	**हात ओला होणे**	फायदा होणे
531	**हात चोळणे**	चरफडणे
532	**हात झाडून मोकळे होणे**	जबाबदारी अंगावर टाकले की व जबाबदारी टाकून टाकून मोकळे होणे
533	**हात टेकणे**	नाइलाज झाल्याने माघार घेणे
534	**हात देणे**	मदत करणे
535	**हात धुवून पाठीस लागणे**	चिकाटीने एखाद्या गोष्टीच्या मागे लागणे
536	**हात न पसरणे**	न मागणे
537	**हात मारणे**	ताव मारणे भरपूर खाणे
538	**हात हलवत परत येणे**	काम न होता परत येणे
539	**हातचा मळ असणे**	सहजशक्य असणे
540	**हातपाय गळणे**	धीर सुटणे
541	**हातभार लावणे**	सहकार्य करणे
542	**हाता पाया पडणे**	गयावया करणे
543	**हातात कंकण बांधणे**	प्रतिज्ञा करणे
544	**हाताला हात लावणे**	थोडीदेखील मेहनत न घेता फुकटचे श्रेय घेणे
545	**हातावर तुरी देणे**	डोळ्यांदेखत फसवून निसटून जाणे
546	**हातावर शीर घेणे**	जिवावर उदार होऊन किंवा प्राणांचीही पर्वा न करणे
547	**हाय खाणे**	धास्ती घेणे
548	**हीच काय दाखविणे**	बळ दाखवून किंमत लक्षात आणून देणे
549	**हुडहुडी भरणे**	थंडी भरणे
550	**हूल देणे**	चकवणे
551	**Yogakshema चालविणे**	रक्षणाची काळजी वाहणे जीवाची मुंबई करणे अतिशय चैनबाजी करणे

स्पर्धा परीक्षांच्या संपूर्ण तयारीसाठी MahaSarav सोबत सराव करा!

दररोज मोफत टेस्ट सिरीज, विषयानुसार प्रश्नसंच व PDF डाऊनलोड करण्यासाठी आजच भेट द्या.

 www.mahasarav.com •
 MahaSarav Mobile App